**मराठी 'भाषा' ऑलिंपियाड परीक्षेची नियमावली**

- **ही परीक्षा इयत्ता २ री ते ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी असून ती, ता.१० नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२५ च्या दरम्यान प्रत्येक सहभागी शाळेने शाळेच्या वेळेत घ्यावी.**

- **या परीक्षेसाठी प्रवेश शुल्क रू. ३००/- फक्त आकारले जाईल. यात परीक्षा शुल्क व परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांच्या तयारीसाठीची मार्गदर्शनपर पुस्तिका आणि प्रमाणपत्र याचा समावेश आहे. पुरवणी वाचनासाठीचे पुस्तक 'भाषा' कडून भेट देण्यात येईल.**

- **परीक्षा शुल्क भरल्यानंतर पुस्तिका परीक्षार्थीला दिली जाईल.**

- **अर्ज भरण्याची अंतिम ता. ३१ जुलै २०२५ आहे.**

- **पुण्यातील आणि पुण्याबाहेरील शाळांनी विद्यार्थ्यांची माहिती पत्रासोबत जोडलेल्या excel sheet च्या स्वरुपात भरावी.**

- **परीक्षेसाठी मुलांना दीड तासाचा वेळ दिला जाईल.**

- पहिल्या पातळीतून प्रावीण्य व विशेष प्रावीण्य मिळवलेले इ.५वी ते ९वी चे विद्यार्थी आपापल्या गावातील, शहरांतील सोयीच्या MKCLच्या MSCIT केंद्रांवरून नाममात्र शुल्क भरून ही परीक्षा देण्यास पात्र राहातील.
- ही दुसरी पातळी 'मराठी 'भाषा' प्रज्ञा परीक्षा' नावाने ओळखली जाईल, ही परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांमधून 'मराठी 'भाषा' प्रज्ञा पदक प्राप्त' गुणवंत विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल. यातील विशेष भाषिक गुणवत्ता आढळलेल्या विद्यार्थ्यांसाठी यंदापासून 'खास मार्गदर्शन उपक्रम' (मेंटॉरशिप प्रोग्रॅम) राबविण्यात येणार आहे. याबद्दलची तपशीलवार माहिती यथावकाश पात्र विद्यार्थ्यांना देण्यात येईल.

'प्रज्ञा पदक' मिळवण्यासाठी Online परीक्षा देणे विद्यार्थ्यांना अनिवार्य राहील. याची कृपया नोंद घ्यावी.

- **परीक्षकांचा निर्णय बंधनकारक राहील.**

**खालील पत्त्यावर शाळेने प्रवेशिका पाठवाव्यात.**

भाषा फाउंडेशन : सी -9 रेणुका कॉम्प्लेक्स, जंगली महाराज रोड, डेक्कन जिमखाना, पुणे 411 004. दूरध्वनी क्रमांक: ०२० - २५५३८१८१ , ९१३००९६०३८, ९८५०९८८९९८
ई - मेल आयडी: bhaashaa.org@gmail.com
कार्यालयीन वेळः सोमवार ते शुक्रवार सकाळी ११.०० ते संध्याकाळी ४.००
वेबसाइट: http://bhaashaa.org यूट्यूब फिल्म : bhaashaa foundation